# पुरी आणि पोळी.

Date: / /
Page No.:

- संग्रहीत -

नुकताच १४ नोव्हें. ला बालदिन साजरा झाला. ही बालकविता माझ्याकडे संग्रहीत होती पण आतापर्यंत मी बराच पाला पाचोळा जमवला आहे त्यात मला ही बालकविता मिळाली :—

ही कविता कोणी लिहीली माहीत नाही. मला खूप भावली

एक होती पोळी, तिला झाली जुळी
एक होता मुलगा, नाव त्याचं फुलका
दुसरी इवलीशी परी, नाव तिचं पुरी

पोळीने दोघांना शिकवलं फुगायला
त्यावरुन दोघे लागले भांडायला

मग आईने केली वाटणी
फुलक्याला दिला तवा
पुरीला मिळाली तळणी
आता दोघे लागले हसायला
लागले आपापल्या जागी फुगायला

फुगता फुगता एक दिवस
पुरीच्या डोक्यात गेली हवा
म्हणत कशी! मला बाई श्रीखंड किंवा आमरसच हवा

फुलका मात्र साधा भोळा
चालायचा त्याला कोणताही मेळ
बघता बघता किंमत फुलक्याची वाढली
पुरी मात्र कधी मधी सणापुरतीच उरली.

—x—x—

आशा पावगी.
'आनंद वन' B, 1
वृंदावन कॉम्प्लेक्स
कोथरुड